# UGC (Prevention, prohibition and redressal of sexual harassment of women employees and students in higher educational institutions)

# Regulations 2015

**Definitions.** - In these regulations, unless the context other wise requires, - **"sexual harassment"** means-

**(i)** ''An unwanted conduct with sexual undertones if it occurs or which is persistent and which demeans, humiliates or creates a hostile and intimidating environment or is calculated to induce Submission by actual or threatened adverse consequences and includes any one or more or all of the following unwelcome acts or behaviour (whether directly or by implication), namely.

a) Any unwelcome physical, verbal or non verbal conduct of sexual nature;
b) Demand or request for sexual favours;
c) Making sexually coloured remarks
d) Physical contact and advances; or
e) Showing pornography"

**(ii)** ''Any one (or more than one or all) of the following circumstances, if it occurs or is present in relation of connected with any behaviour that has explicit or implicit sexual undertones.

a) Implied or explicit promise of preferential treatment as quid pro quo for sexual favours;
b) Implied or explicit threat of detrimental treatment in the conduct of work;
c) Implied or explicit threat about the present or future status of the person concerned;
d) Creating an intimidating offensive or hostile learning environment;
e) Humiliating treatment likely to affect the health, safety dignity or physical integrity of the person concerned;''

## UGC (Prevention, prohibition and redressal of sexual harassment of women employees and students in higher educational institutions)

## Regulations 2015

## <u>List of The Committee Member</u>

- Dr. Mona Chimote - Chairperson
  (Prof. & Head, Dept. of Marathi)

- Dr. V.N. Nathar - Member
  ( Prof. & Head, Dept. of Botany)

- Dr. Vaishali Dhanvijay - Member
  (Prof. Department of Home Science)

- Shri. Mangesh Warkhede - Member
  (Dy. Registrar, Academics)

- Dr. Smita Sathe - Member
  (Superintendent, Establishment)

- Dr. Mohana Kulakarni - Member
  (Concealer & Social worker )

- Ku.Bhavana p.Jawarkar, - Member
  (BLISC Student,Deptt.of library and Information Scince, SGBAU, Amravati.)

- Ku.Mrunmai U.Landge - Member
  (M.Sc . Deptt.of Botany, SGBAU, Amravati.)

- Shri. Abhijeet Ingle - Member
  (Research Student, Deptt.of Marathi, SGBAU, Amravati.)

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई व
# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती

यांच्या संयुक्त विद्यमाने

## कामाच्या ठिकाणी महिलांचे
## लैंगिक छळापासून संरक्षण (प्रतिबंध, मनाई आणि निवारण)
## अधिनियम २०१३ च्या अंमलबजावणी बाबत

# एक दिवसीय कार्यशाळा



# अहवाल

**दिनांक : गुरुवार, ९ फेब्रुवारी २०१७ - वेळ : सकाळी १० वाजता**

**स्थळ : स्व. डॉ. के. जी. देशमुख सभागृह, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.**

# अहवाल

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या डॉ. के. जी. देशमुख सभागृहात कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगीक छळापासून संरक्षण (प्रतिबंध, मनाई आणि निवारण) अधिनियम २०१३ च्या अंमलबजावणीबाबत कार्यशाळेचे आयोजन दि. ९-२-२०१७ रोजी केले होते. या प्रशिक्षणाला विद्यापीठाशी संलग्नीत सर्वच महाविद्यालयातुन प्रत्येकी दोन अंतर्गत तक्रार समितीचे सदस्य (एक महिला व एक पुरुष) व प्राचार्यांना आमंत्रीत केल्या गेले. तसेच विद्यापीठाच्या शैक्षणीक विभाग व प्रशासकीय विभागांमधुन विभाग प्रमुख व दोन प्रतिनिधी (एक महिला व एक पुरुष) यांना आमंत्रीत केले होते. कार्यशाळेत राष्ट्रीय सेवायोजनेचे महिला अधिकारी व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यशाळेला अमरावती विद्यापीठ परिक्षेत्रातील व विद्यापीठ परिसरातील असे एकुण नउशे सहभागी उपस्थित होते.




कार्यशाळेची नोंदणी करतांना सहभागी




कार्यशाळेची सुरुवात विद्यापीठ गीताने झाली.




कार्यशाळेचे उद्घाटन महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा श्रीमती विजयाताई रहाटकर यांनी केले



श्रीमती विजयाताई रहाटकर यांचे स्वागत करताना
विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. अजय देशमुख



श्रीमती विजयाताई रहाटकर यांना स्मृती चिन्ह
प्रदान करताना मा. कुलगुरु



मा. कुलगुरुचे स्वागत करताना कुलसचिव डॉ. अजय देशमुख



डॉ. मंजुषा मोळवणे यांचे स्वागत करताना डॉ. वैशाली चौखंडे





कार्यक्रमाचे प्रास्तावीक करतांना अंतर्गत तक्रार निवारण समितीच्या अध्यक्षा डॉ. मनिषा काळे

उद्घाटपर भाषणात श्रीमती विजयाताई रहाटकर म्हणाल्या की, पुरातन काळापासून महिला कर्तृत्ववान आहेत. आपल्या देशाचा नावलौकीक त्यांनी वाढविला आहे. सर्वच क्षेत्रात स्त्रीया पुरुषांच्या बरोबरीने काम करीत आहेत. असे असले तरी पुरुष प्रधान व्यवस्थेत स्त्रीयांवर होणारे अत्याचार लांच्छनास्पद आहेत. अरुणा शानबाग व निर्भया सारख्या अनेक स्त्रीया त्यांच्या बळी ठरल्या आहेत. समाजमन ज्या गोष्टी सांभाळू शकत नाही, त्यासाठी कायद्याची निर्मिती झाली आहे. कायदा उत्तम आहे, पण त्याची अंमलबजावणी होण्याची व प्रसार करण्याची खरी गरज आहे.

महिलांचा सन्मान, जीवनमान उंचावणे, पिडित महिलांना न्याय मिळवुन देणे, हे राज्य आयोगाचे कर्तव्य आहे. अंतर्गत महिला तक्रार निवारण समितीची स्थापना प्रत्येक संस्थेत झालेली आहे. या समितीने महिलांच्या तक्रारीची संवेदशील होउन चौकशी करावी व महिलांना न्याय मिळवुन दयावा असे आव्हानात्मक प्रतिपादन श्रीमती विजयाताई रहाटकर यांनी केले.





सहभागींना मार्गदर्शन करतांना श्रीमती विजयाताई रहाटकर

मातृदेव भवः, पितृदेव भवः अशी संस्कारक्षम संस्कृती असलेल्या आपल्या देशात कायद्याची असलेली गरज चिंतनीय आहे. स्त्रीयांवर होणारे लैंगीक अत्याचार घृणास्पद आहेत. सर्वश्रेष्ठ कुटुंब पध्दती असलेल्या भारत देशात गुरुजनांचे संस्कार मुलांवर कमी पडतात की काय? याचे उत्तर सापडले नसल्याचे सांगून महिलांनो अत्याचार सहन करु नका, त्याला वाचा फोडा असे आवाहन श्रीमती कांचन गडकरी यांनी केले.

आपल्या भाषणात ॲड. पद्माताई चांदेकर म्हणाल्या की, स्त्री व पुरुष विषयक भावनेची स्वच्छता अशा प्रकारच्या कार्यशाळेतून होण्यास मदत होणार असुन स्त्री-पुरुष भेद न करण्याचे त्यांनी सांगितले. रामायणात सितेला तर महाभारतात द्रौपदीच्या संरक्षणासाठी पुरुषांनीच लढा दिल्याचे सांगून त्या पुढे म्हणाल्या की समाजाकडुन केवळ स्त्रीयांनाच दोष दिला जातो, अशी खंत व्यक्त करुन या कायद्याचा दुरुपयोग होणार नाही, याची सुध्दा काळजी महिलांनी घ्यावी. स्त्रीयांकडे माणुसकीच्या दृष्टीकोनातून पुरुषांनी बघावे तरच बलशाली भारत होण्यास मोलाचा हातभार लागेल, असे त्यांनी अधोरेखित केले.



सहभागींना मार्गदर्शन करतांना सौ. कांचन गडकरी



सहभागींना मार्गदर्शन करतांना ॲड. पद्माताई चांदेकर

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. मुरलीधर चांदेकर, मा. कुलगुरु, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ हे उपस्थित होते. अध्यक्षीय भाषणात मा. कुलगुरु यांनी स्त्री विषयक सन्मान प्रत्येकाच्या व्यवहारातुन रुजवणाची गरज आहे असे प्रतिपादन केले. समाजात सलोख्याच्या वातावरण निर्मितीसाठी प्रत्येक जण सक्रियतेने जबाबदारी घेतील असे त्यांनी आवाहन केले.



सहभागींना मार्गदर्शन करतांना मा. कुलगुरु डॉ. मुरलीधर चांदेकर



सहभागींना २०१३ च्या अधिनियमावर मार्गदर्शन करतांना श्री. विशाल केडीया

पहिल्या सत्रात श्री. विशाल केडीया यांनी २०१३ च्या अधिनियमावर मार्गदर्शन केले. कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगीक छळापासून संरक्षण (प्रतिबंध, मनाई आणि निवारण) अधिनियम २०१३ च्या कायद्यावर २२ एप्रिल २०१३ रोजी मा. राष्ट्रपती यांनी सही केली. या कायदयाचे नियम ९ डिसेंबर २०१३ रोजी मंजुर झाले याबाबत सहभागींना अवगत केले. कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगीक छळापासून महिलांना संरक्षण देणे, लैंगीक छळास प्रतिबंध करणे आणि अशा तक्रारीचे निवारण करणे, भरपाई देणे आणि या सर्वांशी संबंधीत बाबी किंवा प्रासंगिक बाबी यांचे निराकरण करणे यासाठी हा कायदा आहे. या कायदयामध्ये सामावेश केलेली कामाची ठिकाणे त्यांनी विषद केली. अंतर्गत तक्रार निवारण समितीची स्थापना कशी करावी, सदस्य संख्या किती असावी, स्थानिक तक्रार समितीची स्थापना कशी करावी, या समितीचे कार्यक्षेत्र काय असेल याबाबत सखोल मार्गदर्शन केले.

लैंगीक छळाचा प्रसंग घडल्यापासुन तीन महिन्याच्या आंत किंवा सतत लैंगीक छळ असेल तर शेवटच्या प्रसंगापासून तिन महिन्याच्या आंत पिडीत महिलेने तक्रार दाखल करावी. पिडीत महिलेने तिन महिन्यानंतर तक्रार केली असल्यास व उशीराचे कारण लेखी दिल्यास व ते कारण समितीला मान्य असल्यास तिन महिन्यानंतरही अर्ज स्विकारला जातो. पिडीत महिला शारिरीक असमर्थपणामुळे तक्रार करण्यास असमर्थ असेल तर तिच्या वतीने तिचे नातेवाईक व सहकारी सुध्दा तक्रार करु शकतात याबाबत श्री. विशाल केडीया यांनी सहभागींना अवगत केले. तक्रारीच्या चौकशी प्रक्रियेबाबत सविस्तर सांगितले. चौकशी पुर्ण झाल्यावर अंतर्गत तक्रार समितीला आपला अहवाल सादर करणे आवश्यक आहे.

दुसऱ्या सत्रात यु.जी.सी. विनियम २०१५ बाबत श्री. विशाल केडीया यांनी सविस्तर माहिती दिली. हा विनियम सर्व भारतभरातील उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थांना लागु आहे. या विनिमयात येणाऱ्या सर्वच शब्दांच्या operational

definitions त्यांनी सहभागींना समजावून सांगितल्या. सोबतच उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थांच्या जबाबदारीबाबतही सविस्तर मार्गदर्शन केले. उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थांमध्ये सुध्दा अंतर्गत तक्रार निवारण समिती असणे आवश्यक आहे. या समितीमधील अध्यक्ष व सदस्याबाबत, समितीची कार्यप्रणाली, समितीच्या जबाबदाऱ्या, तक्रार करण्याची पध्दत व नंतर चौकशी करण्याच्या पध्दती याबाबत सखोल मार्गदर्शन केले. याबाबत आरोपीला होणाऱ्या शिक्षेबाबतही सांगितले.

डॉ. मंजुषा मोळवणे, उपसचिव, महाराष्ट्र राज्य महिला आयोग यांनी सहभागींना दि. २७-२-२०१७ ला याबाबत कार्यशाळा आपआपल्या महाविद्यालयात आयोजन करण्याबाबत मार्गदर्शन केले. याशिवाय सहभागींना येणाऱ्या संभाव्य अडचणींचे सुध्दा निरसन केले.

कार्यशाळेचे दोन्ही सत्र संपल्यानंतर श्री. विशाल केडीया यांनी सहभागींच्या अडचणी सोडविण्यासाठी वेळ दिला. यानंतर विद्यापीठाच्या वतीने महाराष्ट्र महिला आयोगाच्या अध्यक्षा श्रीमती विजयाताई रहाटकर, उपसचिव डॉ. मंजुषा मोळवणे, श्री. मानकर व श्री. विशाल केडीया यांचे आभार डॉ. सौ. मोना चिमोटे यांनी मानले. राष्ट्रगीतानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

मंचावर सौ. कांचनताई गडकरी, ॲड. पद्माताई चांदेकर , कुलसचिव डॉ. अजय देशमुख, बी.सी.यु.डी. चे संचालक डॉ. राजेश जयपुरकर, आयोगाच्या उपसचिव डॉ. मंजुषा मोळवणे विद्यार्थी कल्याण विभागाचे संचालक डॉ. गणेश मालटे व कार्यशाळेचे साधन व्यक्ती श्री. विशाल केडीया उपस्थित होते.



कार्यक्रमाचे उद्बोधन करताना डॉ. मंजुषा मोळवणे



आभार व्यक्त करताना डॉ. मोना चिमोटे

अमरावती जिल्ह्यासाठी महाराष्ट्र राज्य आयोगाच्या विविध कार्यक्रमाचे समन्वयक म्हणुन कार्यरत असलेले श्री. जयवंत गाडेकर व विभागीय समन्वयक श्री. अनिल रेवतकर यांनी कार्यक्रमाच्या आयोजनासाठी सहकार्य केले.

कुलसचिव

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती

महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या गृहविज्ञान विभाग व

कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण

(प्रतिबंध, मनाई आणि निवारण) अधिनियम २०१३

अंतर्गत तक्रार निवारण समिती

यांचे संयुक्त विद्यमाने आयोजित

# एक दिवसीय कार्यशाळा

## " विद्यापीठ महिला कर्मचाऱ्यांचे आरोग्य व कायदे विषयक सक्षमीकरण"



# अहवाल

दिनांक : बुधवार, ८ मार्च २०१८ - वेळ : सकाळी ११ वाजता

स्थळ : दृकश्राव्य सभागृह, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.

॥ निमंत्रण ॥

महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई आणि
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या गृहविज्ञान विभाग
व कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण (प्रतिबंध, मनाई आणि निवारण) अधिनियम-२०१३ अंतर्गत तक्रार निवारण समिती
यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित एक दिवसीय कार्यशाळा

## "विद्यापीठ महिला कर्मचाऱ्यांचे आरोग्य व कायदेविषयक सक्षमीकरण"

गुरुवार दिनांक ८ मार्च २०१८, वेळ : सकाळी ११.०० वाजता

**कार्यक्रमाचे अध्यक्ष**
डॉ. मुरलीधर चांदेकर
मा. कुलगुरू
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती

**कार्यक्रमाचे उद्घाटक**
डॉ. अर्चना नेरकर
मा. सहसंचालक
उच्च शिक्षण, अमरावती विभाग, अमरावती

**प्रमुख उपस्थिती**
डॉ. राजेश जयपूरकर
मा. प्र-कुलगुरू
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती

स्थळ : दृकश्राव्य सभागृह, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती

वरील कार्यक्रमास आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे.

विनीत

डॉ. अजय देशमुख
कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
अमरावती

डॉ. मनिषा काळे
विभाग प्रमुख
गृहविज्ञान विभाग
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

## नोंदणी प्रपत्र

महाविद्यालय / विभागाचे नाव :- ______

पत्ता :- ______

भ्रमणध्वनी / फोन क्रमांक :- ______

ई-मेल :- ______

कार्यशाळेत सहभागी होण्यासाठी महिला प्रतिनिधींचे नाव

१) नाव: ______
पदनाम: ______

२) नाव: ______
पदनाम: ______

प्राचार्य / विभाग प्रमुख
(स्वाक्षरी व शिक्का)

## कार्यशाळेची नोंदणी करतांना सहभागी



# अहवाल

महाराष्ट्र महिला आयोग, मुंबई आणि संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या गृहविज्ञान विभाग व कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण (प्रतिबंध, मनाई आणि निवारण) अधिनियम-२०१३ अंतर्गत तक्रार निवारण समिती यांच्या संयुक्त विद्यमाने एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन '' विद्यापीठ महिला कर्मचाऱ्यांचे आरोग्य व कायदे विषयक सक्षमीकरण '' या विषयावर दि. ८ मार्च २०१८ रोजी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या दृकश्राव्य सभागृहात केले होते. या कार्यशाळेला विद्यापीठाच्या शैक्षणीक व प्रशासकीय विभागातील तसेच विद्यापीठ कार्यक्षेत्रातील संलग्नित महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर महिला कर्मचारी (एकुण १७०) उपस्थित होते.

या एकदिवसीय कार्यशाळेच्या उद्‌घाटन सभारंभाचे अध्यक्ष संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे सन्माननीय कुलगुरु डॉ. मुरलीधर चांदेकर हे होते तर राज्य महिला आयोगाचे अमरावती जिल्हा समन्वयक श्री. जयवंत गाडेकर तसेच श्रध्दा आर्ट सोसायटीच्या अध्यक्षा सौ. ज्योती तोटेवार, कार्यशाळेच्या साधनव्यक्ती डॉ. मोहना कुलकर्णी, ॲड. डॉ. सुप्रिया यादगिरवार, ॲड. सोनाली क्षीरसागर, गृहविज्ञान प्रमुख व कामाची ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण (प्रतिबंध, मनाई आणि निवारण) अधिनियम-२०१३ अंतर्गत तक्रार निवारण समितीच्या अध्यक्षा डॉ. मनिषा काळे मंचावर उपस्थित होते.





कार्यशाळेची सुरुवात विद्यापीठ गीताने झाली.





दिप प्रज्वलन करतांना मा. मुरलीधर चांदेकर व डॉ. मोहना कुलकर्णी



मा. श्री. मुरलीधर चांदेकर यांचे स्वागत
करताना डॉ. मनिषा काळे



मा. श्री. जयवंत गडेकर यांचे स्वागत
करताना डॉ. मनिषा काळे



सौ. ज्योती तोटेवार यांचे स्वागत
करताना डॉ. मनिषा काळे



डॉ. मोहना कुलकर्णी यांचे स्वागत
करताना डॉ. मनिषा काळे



ॲड. डॉ. सुप्रिया यादगीरवार यांचे स्वागत
करताना डॉ. मनिषा काळे



ॲड. सोनाली क्षीरसागर यांचे स्वागत
करताना डॉ. मनिषा काळे



कार्यक्रमाचे प्रास्तावीक करतांना अंतर्गत तक्रार निवारण समितीच्या अध्यक्षा डॉ. मनिषा काळे



कार्यक्रमात सहभागींना मार्गदर्शन करतांना श्रध्दा आर्ट सोसायटीच्या अध्यक्षा सौ. ज्योती तोटेवार



कार्यक्रमात सहभागींना मार्गदर्शन करतांना राज्य महिला आयोगाचे अमरावती जिल्हा समन्वयक श्री. जयवंत गडेकर



कार्यक्रमात सहभागींना मार्गदर्शन करतांना संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरु मा. डॉ. मुरलीधर चांदेकर

आपल्या भाषणात सौ. ज्योती तोटेवार यांनी रोजच्या जगण्यातले अनुभव सांगून महिलांनीच महिलांना समजून घेण्याची व मदतीची गरज आहे असे सांगितले. श्री. जयवंत गाडेकर यांनी समाजात स्त्रियांचे स्थान महत्वाचे असून शिक्षणामुळे महिलांची प्रगती होत आहे असे प्रतिपादन केले. सन्माननीय कुलगुरु डॉ. मुरलीधर चांदेकर यांनी समाजाच्या संतुलित विकासासाठी स्त्री–पुरुष समानता महत्वाची आहे असे भाष्य केले. ज्या महिला विकास व सक्षमीकरणाच्या प्रवाहात आल्या आहेत त्यांच्या वरील जबाबदारी मोठी असून प्रवाहात नसणाऱ्यांसाठी त्यांनी काम करण्याची गरज आहे असेही नमूद केले.

आभार प्रदर्शन ग्रंथालय व माहितीशास्त्र विभागप्रमुख तसेच अधिनियम – २०१३ अंतर्गत तक्रार निवारण समितीच्या सदस्या डॉ. वैशाली चौखंडे यांनी केले.

## सत्र १ : आरोग्य विषयक सक्षमीकरण




उपस्थितांना संबोधीत करताना डॉ. मोहना कुलकर्णी

कार्यशाळेचे पहिले सत्र आरोग्य विषयक सक्षमीकरण हे होते. यात साधन व्यक्ती डॉ. मोहना कुलकर्णी यांनी शारिरीक, सामाजिक आणि मानसिक स्वास्थ कसे एकमेकांवर अवलंबून आहे ते सांगितले. स्त्रियांचे मानसिक स्वास्थ हे नेहमी दुर्लक्षित असते आणि त्यामुळे विविध परिणामांना सामोरे जावे लागते त्यात रुढी, परंपरा याचा दबाव यामुळे महिलांच्या आरोग्याची हेळसांड होते. डॉ. मोहना कुलकर्णी यांनी छोट्या छोट्या रोजच्या जगण्यातील उदाहरणाव्दारे मानसिक स्वास्थ कसे टिकवून ठेवावे हे सांगितले.

## सत्र २ : कायदे विषयक सक्षमीकरण




उपस्थितांना संबोधीत करताना ॲड. डॉ. सुप्रिया यादगीरवार

दुसऱ्या सत्रात ॲड. डॉ. सुप्रभा यादगिरवार व ॲड. सोनाली क्षीरसागर या साधनव्यक्ती होत्या.

ॲड. डॉ. सुप्रभा यादगिरवार यांनी महिला विषयक कायदयांची माहिती विस्तृतपणे प्रेझेनटेशनव्दारे दिली. अत्याचार झाल्यास तक्रार नोंदविण्याच्या प्रक्रियेपासून ते न्यायालयात मिळणाऱ्या मदतीपर्यंत महिती त्यांनी दिली. तसेच निरनिराळ्या अन्याय व अत्याचारासाठी कुठले कायदे आहेत हे त्यांनी सविस्तरपणे समजावून सांगितले.

 

उपस्थितांना संबोधीत करताना ॲड. सोनाली क्षीरसागर

ॲड. सोनाली क्षीरसागर यांनी POSCO या कायद्याविषयी माहिती दिली. बालकांवर कसे लैंगिक अत्याचार होतात आणि अश्या गुन्हांना शिक्षेची तरतूद याबद्दल त्यांनी सविस्तार महिती दिली. बालकांवरील लैंगिक अत्याचारासंबंधी केसेस हाताळतांना येणारे अनुभव त्यांनी उपस्थितांसमोर मांडले. अश्या भयावह परिस्थितीतून बालकांचे शारिरीक आणि मानसिक भावविश्व कसे उद्वस्त होते आणि म्हणून POSCO सारख्या कायद्यांची गरज कशी आहे हे त्यांनी अधोरेखीत केले.

समारोपीय कार्यक्रमाला गृहविज्ञान प्रमुख व अधिनियम-२०१३ अंतर्गत तक्रार निवारण समितीच्या अध्यक्षा डॉ. मनिषा काळे तसेच समितीच्या सदस्या डॉ. वैशाली चौखंडे व डॉ. मोना चिमोटे, साधनव्यक्ती डॉ. सोनाली क्षीरसागर उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे संचलन व आभार प्रदर्शन प्रा. वैशाली धनविजय यांनी केले. कार्यशाळेबद्दल निवडक सहभागींचा अभिप्राय जाणून घेतला व प्रमाणपत्राचे वितरण करण्यात आले.

# अंतर्मुख करणारी कार्यशाळा




सकाळ

# संतुलित विकासासाठी महिला सक्षमीकरणाची गरज

## कुलगुरू डॉ. चांदेकर : विद्यापीठात जागतिक महिलादिनानिमित्त व्याख्यान



मातृभूमि

शुक्रवार, दि. ९ मार्च २०१८



# समाजाचा संतुलित विकास होण्यासाठी महिल

■ विद्यापीठात जागतिक महिला दिनानिमित्त विविध मान्यवरांचे व्याख्यान संपन्न



प्रतिनिधी/८ मार्च

अमरावती :-समाजाचा संतुलित विकास होण्याची गरज आहे, स्त्री-पुरुष समानता त्यासाठी महत्वाची आहे. महिला सक्षमीकरण व सबलीकरण आजची गरज असून त्यासाठी समाजाचा माईंडसेट बदलण्याची आवश्यकता असल्याचे प्रतिपादन कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर यांनी केले. विद्यापीठात जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई आणि संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या गृहविज्ञान विभाग व कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण (प्रतिबंध, मनाई आणि निवारण) अधिनियम-2013 अंतर्गत ... समिती यांचे संयुक्त विद्यमाने 'विद्यापीठ महिला कर्मचाऱ्यांचे आरोग्य व कायदेविषयक सबलीकरण' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजनप्रसंगी उद्घाटक तथा अध्यक्षस्थानावरुन ते बोलत होते.

व्यासपीठावर अतिथी म्हणून महाराष्ट्र राज्य महिला आयोग, अमरावती जिल्हा समन्वयक जयश्री गाडेकर, श्रद्धा आर्ट सोसायटीच्या अध्यक्ष सौ. ज्योती तोटेवार, डॉ. मोहना कुळकर्णी, डॉ. सुप्रिया पाटणिरकर, अॅड. सोनाली क्षीरसागर, गृहविज्ञान विभागप्रमुख डॉ. मनिषा काळे उपस्थित होते. कुलगुरु म्हणाले, महिला अधिकाराची चळवळ सर्वप्रथम न्युयार्क येथे सन 1909 ला सुरु झाली. शतक होवून गेले, पण महिलांवरील अत्याचार सुरच राहिले. गेल्या आठ वर्षांपासून जागतिक महिला दिन साजरा होतोय. त्याकाळी पुरुषप्रधान संस्कृती अशी समाजाची संकल्पना होती. यापूर्वी अकराव्या शतकात चक्रधर स्वामींनी महिलांच्या समानतेविषयी चळवळ उभारली. 'प्रेस फॉर प्रोग्रेस' ही यंदा वर्षीच्या महिला दिनाकरीता शासनाने ठेवली असून महिलांचे सक्षमीकरण आणि सबलीकरण करण्यासाठी समाजाचा दृष्टीकोन सकारात्मक असून त्यानुसार शीघ्रपणे महत्व अधिक असल्याचे सांगून कुलगुरु पुढे म्हणाले, भारताला अनेक पराक्रमी महिलांचा गौरवशाली इतिहास

अमरावती-इव्हनिंग | १० मार्च, २०१८ पान-२

# समाजाचा संतुलित विकास होण्यासाठी महिला सक्षमीकरणाची गरज : कुलगुरु

## विद्यापीठात जागतिक महिला दिनानिमित्त विविध मान्यवरांचे व्याख्यान संपन्न





तरुण भारत | शनिवार, १० मार्च २०१८



डॉ. मुरलीधर चांदेकर मार्गदर्शन करताना. व्यासपीठावर जयंत गाडेकर, ॲड. सोनाली क्षीरसागर, डॉ. मनिषा काळे, ज्योती लोटेकर, डॉ. मोहना कुलकर्णी, डॉ. सुप्रिया वाढविस्कार

# समाजाची मानसिकता बदलण्याची गरज : कुलगुरू

जागतिक महिला दिनी विद्यापीठात कार्यक्रम

# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती